PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Pinjara
Year: 1972

Song: Upkarasathi Dil
Lyricist: Jagdish Khebudkar

उपकारासाठी दिलं
त्याला दान म्हणू नये
उपकारासाठी दिलं
त्याला दान म्हणू नये
शिकवूनी कमी झालं
त्याला ज्ञान म्हणू नये
शिकवूनी कमी झालं
त्याला ज्ञान म्हणू नये
नजरेला दावी पाप
त्याला नेत्र म्हणू नये
नजरेला दावी पाप
त्याला नेत्र म्हणू नये
विसरला आई बाप
त्याला पुत्र म्हणू नये
विसरला आई बाप
त्याला पुत्र म्हणू नये

पाण्यामधी बुडविते
तिला नाव म्हणू नये
पाण्यामधी बुडविते
तिला नाव म्हणू नये
आदर्शाला तुडविते
त्याला गाव म्हणू नये
आदर्शाला तुडविते
त्याला गाव म्हणू नये
ओ...
तुणतुण्याची निंदा करी
तिला वीणा म्हणू नये
तुणतुण्याची निंदा करी
तिला वीणा म्हणू नये
नाही
त्याला शहाणा म्हणू नये
त्याला शहाणा म्हणू नये

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*